।। श्री ।।

मौजे मनमाड
शिघ्रगणक मुल्यांकन तक्ता क्रमांक ............
गाळयाचे बांधीव क्षेत्र ...........०० चौ. मी.
बांधीव भाव प्रति चौ.मी रू ..........................
घसारा : ........... % (........ ते ........... वर्षे)

| | |
|---|---|
| सरकारी मुल्यांकन | रू ......................................./– |
| व्यवहार मुल्य | रू ......................................./– |
| मुद्रांकन शुल्क भरणा | रू ....................................../– |
| नोंदणी फी | रू ....................................../– |

# खरेदीखत

## स्थावर मिळकत कमर्शियल गाळायाचे

आज दिनांक .... माहे ...... इसवी सन २०१८ रोजी ........वार ते दिवशी, नाशिक मुक्कामी

**श्री. .....................................................** **खरेदीखत लिहुन घेणार**
वय : .........., वर्षे , धंदा : ........................
रा. ..........................................................
ता. .......................... जि. ........................
पॅन नं .....................................................

**साईगणेश बिल्टकॉम पार्टनशिप फर्म तर्फे पार्टनर्स** **खरेदीखत लिहुन देणार**
पॅन कार्ड नं ADJFS3017M

०१. सुशिल बन्सीलाल गुजराथी
वय : ६६, धंदा : व्यापार
रा. गणेश ऑटो, मनमाड रोड
येवला ता. येवला, जि. नाशिक
पॅन कार्ड नं AAPPGO613C

०२. अजय भागचंद जैन,
वय : ४८, धंदा : व्यापार,
रा. कंचन सुधा निवास, श्रीकृष्णा कॉलनी,
येवला, ता. येवला, जि. नाशिक
पॅन कार्ड नं AFXPJ8799P

०३. सौ. सिमा बाजीराव शिंदे,
वय : ३६, धंदा : व्यापार,
रा. योगी नगर, नाशिक
ता. , जि. नाशिक
पॅन कार्ड नं AXRPS5192B

०४. साईनाथ नामदेवराव गिडगे,
वय : ४४, धंदा : व्यापार,
रा. सावरकर नगर, हुडको कॉलनी,
मनमाड, ता. नांदगांव, जि. नाशिक
पॅन कार्ड नं AGMPG3092L

कारणे स्थावर मिळकत कमर्शियल गाळयाचे फरोक्त खरेदीखत लिहुन देतो ऐसे जे की :—

(सदरचे दस्ताऐवजात यापुढे लिहुन घेणार **"तुम्ही"** लिहुन देणार यांचा उल्लेख **"आम्ही"** या अर्थाने करण्यात आलेला आहे.)

**१.अ. मिळकतीचे जागेचे वर्णन :—**

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नांदगांव पैकी मौजे मनमाड शिवारातील नगरपालीका हद्दीतील सिटीसर्व्हे हद्‌दी बाहेरील, मालेगांवा नांदगाव रस्त्यावर असलेली स्थावर मिळकत, बखळ बिनशेती जागा मिळकत यांसी रेव्हेन्यू सर्व्हे नं ४/१ यांसी एकुण क्षेत्र ० हेक्टर ७१.५० आर, आकार १.१३ पैकी लिहुन देणार यांचे मालकीचे व कब्जातील एकुण क्षेत्र ० हेक्टर ३७.५० आर (३७५० चौ.मी) यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे

| | |
|---|---|
| पुर्वेस | : लाळे शिंदे यांचे वरद कॉम्प्लेक्स, |
| पश्चिमेस | : मालेगांव रोड, |
| दक्षिणेस | : नांदगांव रोड, |
| उत्तरेस | : लाळे शिंदे यांची मिळकत, |

**१.ब. मिळकतीचे बांधीव इमारतीचे वर्णन :—**

उपरोक्त कलम १अ यांत वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधण्यात आलेली **"साईगणेश बिल्टकॉम"** या नांवाने ओळखले जाणारे कमर्शियल कॉम्पलेक्स यांसी **बिल्डींग नं ................ ....**यांसी बांधीव क्षेत्र ..............चौ. मी यांसी चतु:सीमा येणे प्रमाणे.

| | |
|---|---|
| पुर्वेस | : लाळे शिंदे यांचे वरद कॉम्प्लेक्स, |
| पश्चिमेस | : मालेगांव रोड, |
| दक्षिणेस | : नांदगांव रोड, |
| उत्तरेस | : लाळे शिंदे यांची मिळकत, |

**१.क. गाळा मिळकतीचे वर्णन : –**

उपरोक्त कलम १ब यात वर्णन केलेल्या **“साईगणेश बिल्टकॉम”** या नांवाने ओळखले जाणार कमर्शियल कॉम्पलेक्समधील मिळकतीवर नगरपारिषद मनमाड यांनी मंजुर केलेल्या बिल्डींग प्लॅन नुसार बांधलेली वाणिज्य प्रयोजनासाठी या इमारतीमधील ............ मजल्यावरील बांधीव कमर्शियल गाळा मिळकत यांसी मंजूर बिल्डींग प्लॅननुसार गाळा क्र ............ यांसी बांधीव क्षेत्रफळ .......................... चौ. मी. बांधीव मिळकत यांसी मुंजूर बिल्डींग प्लॅनप्रमाणे यांसी चतु:सीमा येणे प्रमाणे :–

पुर्वेस :
पश्चिमेस :
दक्षिणेस :
उत्तरेस :

येणेप्रमाणे उपरोक्त वर्णन केलेल्या कमर्शियल गाळा मिळकतीत जाणेयेण्याचे वागवहीवाटीचे पुरविलेले व स्वतंत्र इलेक्ट्रीक कनेक्शन व सामाईक पार्कींग वापरण्याचे हक्कांसह मिळकत दरोबस्त.

**२. मिळकतीचा पुर्वइतिहास :–**

उपरोक्त कलम १अ यात वर्णन केलेली मिळकत खरेदी देणार यांनी ही बिनशेती जमिन सौ. आरती नविन शिंगी यांचेकडून ता. १९/०६/२०१३ रोजी दस्त क्र २०१२/२०१३ ने मा. दुययम निबंधक नांदगांव यांचे कार्यालयात नोंदवुन खरेदी घेतलेला असुन त्यांनी संपुर्ण भरणाही आदा केलेला आहे तसेच फेरफार नोंद नंबर २७७०३ ने त्यांचे नाव ७/१२ उता–यावर लागलेले आहे

उपरोक्त कलम १अ यात वर्णन केलेली मिळकत खरेदी देणार यांनी ही बिनशेती जमिन ही साईगणेश बिल्टकॉम या नावाने ता. २३/०८/२०१७ रोजी दस्त क्र १८६६/२०१७ ने मा. दुययम निबंधक नांदगांव यांचे कार्यालयात नोंदवुन खरेदी घेतलेला असुन त्यांनी संपुर्ण भरणाही आदा केलेला आहे तसेच फेरफार नोंद नंबर ................................ ने त्यांचे नाव ७/१२ उता–यावर लागलेले आहे

लिहुन देणार यांनी साईगणेश बिल्टकॉम नावाची पार्टनशिप फर्माची पार्टनरशिप डीड दस्त क्र ३८५५ ता. २९.०५.२०१७ रोजी मे. नोटरी साहेब एल एफ लांडगे, नाशिक , यांचेकडे नोंदविलेली आहे.

प्राप्त झालेल्या हक्क व अधिकारानुसार लिहुन देणार यांनी बांधकाम पुर्ण करून त्यातील गाळयांची विक्री केलेली आहे. ७/१२ रेकॉर्डला मालकी हक्क सदरी आमचे नाव लागलेले असून मिळकत मालकी हक्काने कब्जा वहिवाटीत व उपभोगात आहे. कलम १क यात वर्णन केलेली मिळकत आम्ही विक्री करण्याचे ठरविले त्याची कल्पना तुम्हास मिळालेवरून तुम्ही आमचे संपर्क साधून मिळकत खरेदी करून घेण्याची इच्छा दर्शविली त्यानुसार तुमचे व आमचे दरम्यान बोली बैठक होवून करारनामा निश्चित झाला तो येणे प्रमाणे.

**३. परवानग्या :–**

**अ. वाणिज्य प्रयोजनासाठी विकसन परवानगी :–**

उपरोक्त कलम १अ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे बिनशेती वापराची परवानगी में. मुख्याधिकारी साहेब, मनमाड नगरपरिषद, मनमाड, यांचेकडील आदेश याचे जा. क्र/मनपा/२४३/२०१८, दि. २३/०१/२०१८ अन्वये महाराष्ट जमिन महसूल संहिता १९६६ (दुसरी सुधारणा) अधिनियम २०१४ (महाराष्ट अधिनियम ३७/२०१४) मधील तरतुदीयान्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४२–अ (१) (अ) अन्वये वाणिज्य उपयोगासाठी विकसन परवानगी मिळालेली आहे.

**ब. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला :–**

उपरोक्त कलम १ब यात वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **"साईगणेश बिल्टकॉम"** या इमारतीचा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मनमाड नगर परिषद यांचेकडील पत्र जा. नं./मनपा / ......................... दि. ............................. अन्वये बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिलेला आहे.

**क. बांधकाम परवानगी व प्लॅन मंजुरी :–** उपरोक्त कलम १अ यात वर्णन केलेल्या मिळकत संबंधी मनमाड नगर परिषद मनमाड यांचे कडुन बांधकाम परवानगी व प्लॅन मंजुर करून मिळालेला असुन याचे म्यु. पल बांधकम परवानगी रजि. अ. नं जावक क्रमांक ७६५ सन २०१७, दिनांक ०३/०४/२०१७ अन्वये बांधकाम परवानगी व प्लॅन मंजुरी मिळालेली आहे.

**ड. पार्टनरशिप डीड :–** लिहुन देणार यांनी साईगणेश बिल्ट कॉम नावाची पार्टनशिप फर्माची पार्टनरशिप डीड दस्त क्र ३८५५ ता. २९/०५/२०१७ रोजी में. नोटरी साहेब एल एफ लांडगे, नाशिक , यांचेकडे नोंदविलेली आहे.

वरील सर्व कागदपत्रांची तुम्ही शहानिशा करून घेतल्यानंतर सदर मिळकतीचे ॲग्रीमेंट टू सेल लिहून ठरले ते येणेप्रमाणे.

## :: करारनाम्याच्या अटी व शर्ती येणेप्रमाणे ::

**०१. मिळकतीची किंमत :–**

उपरोक्त कलम १क मध्ये वर्णन केलेली मिळकतीची किंमत तुमचे व आमचे दरम्यान रक्कम रू ................................................अक्षरी रक्कम रूपये ............................................ ........................................मात्र इतकी ठरली असून सदरची किंमत आजचे प्रचलीत बाजारभावा नूसार योग्य व बरोबर आहे. तसेच सदरची किंमत तुम्हास उभयपक्षांना मान्य असून सदरच्या किंमती बाबत आमची वाद किंवा तक्रार नाही. भरणा तपशील शेवटी दिलेला आहे.

**०२. भरणा :–**

उपरोक्त कलम १क यात वर्णन केलेल्या मिळकतीची किंमत तुमचे व आमचे दरम्यान रक्कम रू ............................................../– अक्षरी रक्कम रूपये.......................................... ......................................... मात्र इतकी ठरली असून त्याचा भरणा तुमचेकडून आम्हास

चेक नं ........................................... दि. .............................. ........................... ........................ बॅक शाखा .........................जि. नाशिक अन्वये मिळाले तो भरणा पावला. भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार राहीलेली नाही. मिळकतीच्या किंमतीपोटी आता कोणतीही रक्कम येणे बाकी नाही.

**<u>०३. टायटल :—</u>**

उपरोक्त कलम १क मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे टायटल संपुर्णपणे निर्वेध व बिनबोजाचे आहे. सदर मिळकतीवर गहाण, दान, लिज, लिन, अन्न वस्त्र तारण, बक्षिस मृत्यूपत्र, वारस, जप्ती, जामीनकी, कोर्टवाद अगर असा अन्य कुठलाही बोजा नाही. मिळकतीवर आमचे व्यतीरीक्त अन्य कोणीही आपला हक्क हितसंबध कब्जा मालकी सांगत नाही. मिळकतीवर बॅक कर्ज, अथवा त्यासाठी तारण असा बोजा नाही. मिळकती संबंधाने कुठल्याही कोर्टात दावा न्यायप्रविष्ट नाही अगर मिळकत विक्री करू नये असा कुठल्याही कोर्टाचा मनाई हुकुम नाही. अशाप्रकारे उपरोक्त मिळकत पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे. हे आम्ही तुम्हाला खात्रीने सांगुन भरवश्याने लिहून दिले आहे. तसेच तुम्ही दैनिक .............................. आवृत्तीमध्ये दि. ................................................ रोजी तुमचे अॅड. ......................................... ................., रा. ............................................................... यांचे मार्फत जाहीर नोटीस दिली होती त्यास आजपर्यत कोणत्याही प्रकारची हरकत आलेली नाही. तसा दाखला त्यांनी तुम्हास दिलेला आहे. याउपरही तथापी सदर मिळकतीच्या अनुषंगाने मुद्रांक शुल्क देय निघाल्यास त्यांची संपुर्ण रक्कम लिहून देणार भरणा करतील. त्याची तुम्हास तोषी लागू देणार नाही मिळकतीचे निर्वेध, निर्विवादपणाअद्दल तुम्ही खात्री करून घेतलेली आहे. सदरील मिळकम निर्वेध व निर्विवाद व बोजाविरहीत असल्याची खात्री तुम्ही माझेकडील सर्व कागदपत्रे पाहुन करून घेतलेली आहे. तसेच इमारतीचे बांधकामाचा नकाशा व मंजुरी देखील तुम्हास दाखविलेली आहे. त्यामुळे या मिळकतीचे मालकी हक्काबाबत, बांधकामाबाबत तुमचे पुर्ण समाधान झालेले आहे. तक्रार नाही.

**<u>०४. मिळकतीचा कब्जा :—</u>**

उपरोक्त कलम १क मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा आम्ही तुम्ही आज रोजी कायदेशीररित्या मोजून मापून दिला असून सदरच्या मिळकतीचा कब्जा तुम्ही स्विकृत केला आहे. कब्जा व क्षेत्रफळाबाबत तुमची कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे वेगळी कब्जापावती लिहून घेण्याची आवश्यकता नाही.

**<u>०५. मिळकत नोंदणीचा खर्च :—</u>**

उपरोक्त कलम १क मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे हस्तांतरण करण्यासाठी भरावी लागणारी स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी टायपींग, झेरॉक्स, वकिल फी इत्यादी संपुर्ण खर्च तुमचे तुम्ही सोसलेला आहे.

**<u>०६. मालकी हक्काचे हस्तांतरण :—</u>**

उपरोक्त कलम १क मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे उभपक्षांमध्ये व्यवहार बकी राहिलेला नाही तसेच मिळकतीचा कब्जाही तुम्ही स्विकृत केलेला आहे. त्यामुळे सदरच्या दस्तामध्ये घरपट्टी रेकॉर्डला व म.रा.वि.वि.कं.लि., रेकॉर्डला तुमचे नाव लावून घ्यावे.

सदर बांधीव गाळयामध्ये इलेक्ट्रीक मिटर विद्युत पुरवठा तसेच तुमचे व्यवसायासाठी पाणीपुरवठा आवश्यक असल्यास सदरील सर्व तुमचे स्वखर्चाने घ्यावयाचे आहे. त्याचे बिल तुम्ही परस्पर भरावयाचे आहे.

**०७. मिळकतीचे कर व टॅक्सेस चा भरणा :–**

उपरोक्त मिळकतीचे खरेदीखतापावेतोचे सर्व कर टॅक्सेस आम्ही भरावयाचे असून त्यानंतरचे येणारे सर्वस्वी कर व टॅक्सेस तुमचे तुम्ही मालक या नात्याने भरावयाचे सोसावयाचे आहेत. आजपासुन पुढील सर्व प्रकारचे कर, महसुल कर, नगरपरिषद कर, विज बिल, पाणी बिल आणि जे काही कर सदरील गाळा क्र .............. ला लागु असतील ते सर्व भरावयाची जबाबदारी तुमचेवर राहील.

या गाळयावर सेंट्रल एक्साईस ॲन्ड कस्टम सरकारी नियमाने जीएसटी टॅक्स लागु केलेला आहे. हा जीएसटी टॅक्स तुम्ही देण्याचे कबुल केले आहे. जीएसटी टॅक्स देण्याची संपुर्ण जबाबदारी तुमचेवरच राहील.

**०८. मिळकत मेन्टनन्स खर्च इत्यादी**

भविष्यात कॉम्पलेक्समध्ये काही सुखसोयी उपलब्ध करावयाचे झाल्यास येणारा संबंधीत खर्च आपल्याकडून आकारला जाईल व तो देणेस आपण कबुली दिलेली आहे. तसेच मेन्टनन्स खर्च जे निश्चित होतील ते देणेस आपण बांधिल आहात. सदरील इमारतीची स्वच्छता व देखभाल करण्यासाठी सफाई कामगार, रखवालदार, संडास, पाणी इत्यादीसाठी लागणारा खर्च प्रत्येक वापरदाराने त्याचे हिस्सेराशी प्रमाणे देणे बंधनकारक असल्यामुळे तुम्हास देखील तो खर्च देणे बंधनकारक आहे.

**०९. मलकाचे आधिकार**

पुर्ण मिळकतीस, संकुलास, **“साईगणेश बिल्टकॉम”** हे नांव दिलेले आहे. तसेच परिसराचे नांव .......................................... हे असुन या नांवामध्ये कोणताही बदल कधीही करावयाचा नाही. सदर इमारतीतील जिने, कॉमनपेसेज, अंतिम मजल्यावरील गच्ची, दुकानात / गाळयात येण्याजाण्यासाठीची वहिवाटीची जागा, इत्यादी या मुळमालकाचे मालकीची राहणार आहेत. सदर गाळा / दुकानात येण्याजाण्यासाठी तुम्ही ... बाजुचा वापर करावा. विकलेल्या दुकानाचे जागेशिवाय इतर मिळकतीचा वापर करता येणार नाही. मुळमालकाचे इतर कोणत्याही जागेचा तुम्हास कोणत्याही प्रकारे उपयोग करता येणार नाही.

सदरील मिळकत जमीनीवर आणि मजल्यावरचे बांधकाम करणेसाठी आज उपलब्ध असलेला एफ. एस. आय. व भविष्यात उपलब्ध होणारा एफ. एस. आय. यानुसार मुळ मालक, असलेले मालक, मुखत्यार, यापैकी संबंधित हे बांधकाम करणार आहे. त्यावेळेस तुम्हास अडचण आणि त्रास होणार आहे. याबाबतीत तुम्ही काहीही अडचण न करता बांधकाम करणारे संबंधित व्यक्तीस सहकार्य करणेचे आहे. एफ. एस. आय. वाढवुन मिळालेनंतर त्याचा पुर्ण हक्क आमचा आहे व राहील.

**१०. मिळकतीत कोणताही बदल करता येणार नाही.**

मिळकतीचा उपभोग घेत असतांना तुम्ही छत, तळ जमीन, अथवा इमारतीच्या कोणत्याही भागास आरपार छिद्र न पाडता तुमच्या सुखासोयी आतल्याआत कराव्यात. कोणत्याही बाजुने तुम्हास हल्लीच्या मिळकतीत असलेले शटरशिवाय दारे, खिडक्या, झरोके, इतर काढता येणारा नाहीत. तुम्हास विक्री केलेले दुकान / गाळयातील छोटया व मोठयास्वरूपाच्या दुरूस्त्या या तुम्हाला स्वखर्चाने करावयाच्या आहेत. मिळकतीत कोणतेही बदल करता कामा नये. इमारतीच्या इतर भागास धोका निर्माण होईल असे बदल, कृत्य करता येणार नाहीत.

## ११. मिळकतीचा वापर कायदेशिर कामी करणे

मिळकतीचा वापर तुम्ही कायदेशीर व्यवहारकामीच करावा, याशिवाय तुम्हास अन्य कोणत्याही कारणास्तव जागेचा वापर करता येणार नाही. मी तुम्हास विक्री केलेल्या बांधीव गाळयामध्ये तुम्ही कोणत्याही प्रकारचे आमली पदार्थ दारू विक्री, मास, मटन इत्यादींची विक्री करावयाची नाही. अगर कोणत्याही प्रकारचे अवैध धंदा, मटका, जुगारचा या गाळयामध्ये व्यापार, व्यवसाय, उपयोग करावयाचा नाही. या मिळकतीत दुकानात, बियरबार, दारू दुकान, स्फोटक पदार्थ व्यवसाय / दुकान करता येणार नाही. करमणुक कार्यक्रम, नाच, गाणे नाटक, सिनेमा, वगैरे, चालविता येणार नाही. अवैध धंदे करता येणार नाही. लगतचे वापरदारांना जाण्यायेण्यासाठी त्रास होईल असे करता येणार नाही.

## १२. मिळकतीचा वापर

तुम्ही सदर बांधीव गाळयाचा वापर व्यवस्थीतपणे करावयाचा आहे. गाळयातील घाण केरकचरा, सांडपाणी इ. सामाईक वापराचे जागेत अथवा मोकळया जागेत टाकावयाचा नाही. इतर वापरदारांना त्रास अथवा उपद्रव होईल असे कोणतेही कृत्य करावयाचे नाही. इतर वापरदारांना कोणतेही प्रकारे त्रास व अडचणीचे होईल असा वापर, अडोसा तुम्ही करता कामानये. वहीवाटीचे जागेत, दुकाना समोर समान, साधने दुसरेस जाण्यायेण्यास अडथळा होईल, इतरप्रकारे त्रास होईल असे ठेवता येणार नाही. दुकानाचे आंतले बाजुस सर्व ते ठेवावे. समोरील वापराचे जागेत मुळ मालकाचे मालकीचे जागेवर व्यापारी माल, वाहने, वा अन्य काहीही, कसेही, कधीही, ठेवता कामानये. तसेच रोड किंवा बांधकाम, आडोसा करूनये.

तुम्हास विक्री केलेला बांधीव गाळयाचे .................... बाजुचे शटर वरील भिंतीवर ठरवुन दिलेले ठिकाणी तुम्ही तुमचे दुकानाचा बोर्ड अथवा जाहिरात लावावयाचा आहे. त्या व्यतिरिक्त इमारतीचे कोणत्याही भिंतीवर छतावर अथवा कोणत्याही अन्य भागामध्ये तुम्ही तुमचे दुकानाचे जाहिरात अथवा बोर्ड लावावयाचा नाही.

## १३. फेरविक्री

स्दर खरेदीखताचा तपशील, शर्ती व विवरण फेरविक्री करतांना बदलता येणार नाही. वापरदारांना याप्रमाणे वागणे बंधनकारक राहील. शर्ती व अटींचा भंग केल्यास कायदेशीर कारवाईस पात्र राहाल. त्याने होणारे खर्चास, नुकसानीस व परिणामास तुम्ही संबंधित जवाबदार राहाल.

आता ही मिळकत तुमची ऑनरशिप बेसिसवर मालकीची व कबजाची वरील अटी शर्तीस अधिन राहुन झालेली आहे. याप्रमाणे तुम्ही याचा उपयोग वंशपरंपराने करावा उपभोग करावा. या दस्तात नमुद केलेल्या अटीनुसार याची विक्री अगर विल्हेवाट लावावी.

येणेप्रमाणे हे खरेदीखत आज रोजी दोन्ही पक्षाने राजीखुशीने स्वसंतोषाने वाचुन पाहुन समजुन उमजुन अक्कलहुशारीने एकमेकास खालील साक्षीदारांसमक्ष लिहुन दिले असे हे आम्ही आमचे वालीवारीस व संबंधीतावर बंधनकारक राहील. मु. मनमाड येथे ता. .......................... रोजी

**<u>खरेदीखत लिहुन देणार चे नाव व सही फोटो</u>**

साईगणेश बिल्टकॉम पार्टनशिप फर्म तर्फे पार्टनर्स

०१. सुशिल बन्सीलाल गुजराथी
(लिहुन देणार)

०२. अजय भागचंद जैन,
(लिहुन देणार)

०३. सौ. सिमा बाजीराव शिंदे,
(लिहुन देणार)

०४. साईनाथ नामदेवराव गिडगे,
(लिहुन देणार)

**<u>खरेदीखत लिहुन घेणार चे नाव व सही फोटो</u>**

**श्री. ..............................................................**
(लिहुन घेणार)

**साक्षीदार**

**१. श्री. ................................................................**
रा. ...................................................................
ता. .............................., जि. ............................

**२. श्री. ...............................................................**
रा. ....................................................................
ता. .............................., जि. ............................

## <u>फॉर्म ४</u>
## <u>अलोटमेंट लेटर / कब्जा भरणा पावती</u>

साईगणेश बिल्टकॉम पार्टनशिप फर्म तर्फे पार्टनर्स

०१. सुशिल बन्सीलाल गुजराथी

०२. अजय भागचंद जैन,

०३. सौ. सिमा बाजीराव शिंदे,

०४. साईनाथ नामदेवराव गिडगे,
(लिहुन देणार)

**प्रति,**
**श्री. / सौ/ श्रीमती** ..........................................................
(लिहुन घेणार)

मोहदय,

०१. ज्याअर्थी आपण आमचे ऑफर पत्र क्रं .......................... ता. ..........................चे मंजुर केलेले असुन तुम्ही मोबदला रक्कम दिले नंतर आज रोजी आम्ही आपणास खालील वर्णन मिळकतची अलोटम्टें करीत आहोत.

**<u>गाळा मिळकतीचे वर्णन : —</u>**

यात वर्णन केलेल्या **"साईगणेश बिल्टकॉम"** या नांवाने ओळखले जाणार कमर्शियल कॉम्पलेक्समधील मिळकतीवर नगरपारिषद मनमाड यांनी मंजुर केलेल्या बिल्डींग प्लॅन नुसार बांधलेली वाणिज्य प्रयोजनासाठी या इमारतीमधील .................... मजल्यावरील बांधीव कमर्शियल गाळा मिळकत यांसी मंजूर बिल्डींग प्लॅननुसार गाळा क्र ........... यांसी बांधीव क्षेत्रफळ .......................... चौ. मी. बांधीव मिळकत यांसी मुंजूर बिल्डींग प्लॅनप्रमाणे यांसी चतु:सीमा येणे प्रमाणे :—

पुर्वेस :
पश्चिमेस :
दक्षिणेस :
उत्तरेस :

**<u>०२. मिळकतीचा कब्जा :—</u>**

उपरोक्त वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा आम्ही तुम्हास आज रोजी कायदेशीररित्या मोजून मापून दिला असून सदरच्या मिळकतीचा कब्जा तुम्ही स्विकारलेला आहे. कब्जा व क्षेत्रफळाबाबत तुमची कोणतीही तक्रार नाही.

**०३. भरणा :–**

उपरोक्त वर्णन केलेल्या मिळकतीची किंमत तुमचे व आमचे दरम्यान रक्कम रू ................. ............................/– अक्षरी रक्कम रूपये........................................................ ........................ मात्र इतकी ठरली असून त्याचा भरणा तुमचेकडून आम्हास मिळाले तो भरणा पावला. भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार राहीलेली नाही. मिळकतीच्या किंमतीपोटी आता कोणतीही रक्कम येणे बाकी नाही. तशी पावती देखील दीली आहे.

मनमाड

ता.

आपला अभिलाशी

साईगणेश बिल्टकॉम पार्टनशिप फर्म तर्फे पार्टनस

**श्री. / सौ/ श्रीमती** ......................
(लिहुन घेणार)

०१. सुशिल बन्सीलाल गुजराथी

०२. अजय भागचंद जैन,

०३. सौ. सिमा बाजीराव शिंदे,

०४. साईनाथ नामदेवराव गिडगे,
(लिहुन देणार)

# FORM IV

**Allotment Letter**

No. AB/EM/--

Office of the Chief Officer

AURANGABAD HOUSING AND AREA

DEVELOPMENT BOARD

Grha Nirman Bhavan Mahaveer Stambh

C.B.S Road, Aurangabad

Dated :

To

Shri / Smt.

Sir /Madam

1. Whereas you have accepted the Offer of a tenement made to you in our letter No. _________________ dated ___________ and whereas you have made the necessary payment and have executed the requisite affidavit you are now informed that you have been allotted tenement No ________________________ in Building No. ____________ at _______________________________________________________________
_______ _______________________________________________________

2. The tenement has been completed and is ready for occupation, you are requested to present yourself at site on any working day, within 15 days before __________________ who is authorised to hand over the possession of the tenement to you.

3. In token of having received possession you are requested to give receipt to the aforesaid officer in the accompanying form

Yours faithfully

(Estate Manager)

Aurangabad Housing and A.D.Board